**Blood Donation on the occasion of NCC Day**

लोकमत

# एनसीसीदिनानिमित्त ७५ जणांनी केले रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** १८ महाराष्ट्र एनसीसी बटालियन व नुतन मराठा महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमान एनसीसी दिनानिमित्त महारक्तदान शिबिरात ७५ जणांनी रक्तदान केले.

याप्रसंगी १८ महाबटालियन कमाडिंग ऑफिसर कर्नल अभिजित महाजन, प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, उज्वला वर्मा, लेप्टनंट शिवराज पाटील, लेप्टनंट गौतम भालेराव, प्रा. सायली पाटील, जीसीआय अलका राय, गिरीश महाजन, एनसीसी कॅंडेट आणि पीआय स्टाफ उपस्थित होते.

प्रास्ताविक लेंप्ट. शिवराज पाटील यांनी केले. कर्नल अभिजित महाजन म्हणाले की, देशाप्रती निष्ठा, लष्करी शिस्त आणि एकता रुजवणाचा मार्ग दाखवणाऱ्या एनसीसीच्या आज ७६ वा स्थापनादिनी महारक्तदान शिबीर घेण्यात आले आहे. डॉ. एल. पी. देशमुख यांनी एनसीसी व एनसीसी कॅंडेटद्वारा राबविलेल्या कार्याचे कौतुक करुन रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त कॅंडेटांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. कर्नल अभिजित महाजन, मेजर ए. डी. वाळवी, लेप्टनंट शिवराज पाटील, प्रा. सायली पाटील, बीएचएम अमोल साळुंखे, सुभेदार संदिपकुमार, बीएचएम गुलजार, सुभेदार जहीर, बीएचएम अरूणकुमार यांनी रक्तदान केले. या शिबिरात एकूण ७५ कॅंडेटांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन लेप्टनंट गौतम भालेराव यांनी केले. आभार प्रा. सायली पाटील यांनी मानले.

Hello Jalgaon
Page No. 2 Nov 28, 2023
Powered by: erelego.com